# बाबांचा महिमा अपरंपार

(ले. प्रभाकर जामखेडकर, मुंबई ५१)

अहा बाबांचा महिमा अपरंपार । साई बाबांचा महिमा अपरंपार ॥ धृ॥
माता माझी देवी वणीची, पिता त्र्यंबकेश्वर ।
अशा महात्म्याचा, (संताचा) काय वर्णावा अध्यात्मिक अधिकार ॥१॥
बारा वर्षे तप करूनी सिद्धी मिळविली फार ।
गुप्त होऊनी पुन्हा प्रकटती करण्या जगदोद्धार ॥२॥
खाण संताची, ज्ञानवंताची, धन्य गोदातीर ।
गोदातीरी जणू परमतत्त्वाचा, सदा होई संचार ॥३॥
कोठुनी आला बाल फकिर हा, बाल अवतारी थोर ।
दावी खंडोबा निंबाखाली, भुयाराचे मग दार ॥४॥
गुरुस्थान हे निंबाखाली, साठे बांधती पार ।
उद जाळता भले तयाचे, परमात्मा करणार ॥५॥
गुरुकृपेने कडुनिंबाचा, पाला गोड होणार ।
संसाराच्या निंबवृक्षाला, गुरू हाच आधार ॥६॥
अक्कलकोटचे स्वामी घेती शिरडीला अवतार ।
गुरुपादुका स्थापन करूनि, आदर व्यक्त करणार ॥७॥
भेदभाव ते नष्ट करोनी, एक गुंफावा हार ।
परस्परांवर प्रेम करा रे, प्रेमातून उध्दार ॥८॥
गुरू तारू हे परमार्थाचे, आदर्श गुरू आचार ।
परमार्थामधे तंत्रमंत्र हे, झूट सारे व्यवहार ॥९॥
गुरुकृपेने मी पण सोडा, वृथा अहंकार ।
अहंकारातून बुद्धि सुटता, सत्य तुम्हा दिसणार ॥१०॥
विश्वकल्याणा संत विभुती घेती जगी अवतार ।
जगावेगळी तऱ्हा तयांची, वेड्यापरी व्यवहार ॥११॥
वेडे कसले ब्रह्मांडाला गिळून हे असणार ।
भक्तजनांना वेड लावती, परमतत्त्व दिसणार ॥१२॥
अवलियाला लिला साजेशा, सिद्धाचा अवतार ।
अंतर्यामी शिरून चराचर, सूत्रधार बनणार ॥१३॥
कोण असे 'मी' जाणीव देण्या, घडवी साक्षात्कार ।
देह मानवी धारण करूनि, ईश घेई अवतार ॥१४॥

अन्नपाणी वा कपडालत्ता, कमी नाही पडणार।
एकनिष्ठ भक्ताला कधीही, ददात ना पडणार ॥१५॥
पूज्य भावाने, परमभक्तीने, आराधना करणार।
प्रभूच तुमच्या हाकेसरसा धावून क्षणी येणार ॥१६॥
भक्तासाठी धाव घेण्यासी बाबा सदा तत्पर।
जवळ दूर ॥ अंतर्यामी, बाबा करी उपचार ॥१७॥
चमत्कारांना नाही सीमा, दुःख सारी हरणार।
श्रध्दा सबुरी ठेवा नाथावरी दुःख (संकट) दूर होणार ॥१८॥
राम रहिम हे एकच असती, एकच परमेश्वर।
भेदभाव विसरुनि भजावा, अल्ला मालिक थोर ॥१९॥
प्रेममाणसा जवळी आणी, प्रेमातुनी (परमेश्वर)। ईश्वर।
परस्परांवर, प्राणीमात्रावर प्रेम करा सत्वर ॥२०॥
इतर संताहुनी मार्ग निराळा, नाही शब्दभांडार।
अघटित घटना, चमत्कारावर बाबा भर देणार ॥२१॥
पंचप्राण, इंद्रिये, बुध्दि मन, लोभ जास्त सुटणार।
क्रमाक्रमाने चढता मंदिर, परब्रह्म दिसणार ॥२२॥
द्वारकामाईतील उदित (साईंचे) सारे सामर्थ्य दिसणार।
श्रध्दाबलाचा अनुभव तुम्हा, लाखो भक्त सांगणार ॥२३॥
मशीद नाही द्वारकामाई, कृष्णाचा प्राकार।
अनन्यभावे शरण जाता, कृष्ण भले करणार ॥२४॥
द्वारकामाईतील घंटा आणि रामजन्म अवतार।
उरुस जगाला मानवतेचा, मंत्र आज देणार ॥२५॥
साईसमाधी दर्शन घेता, पुण्य लाभणार।
वारी शिर्डीची जरूर करा रे, प्रभाकर सांगणार ॥२६॥

Kinikar



१९८२